श्री राम चंद्र मिशन®
केवळ खाजगी वितरणाकरिता

ECHOES INDIA

मार्च २०१३ खंड ६ अंक २

गुरुदेवांविषयी अहवाल

जानेवारी २०१३

गुरुदेवांचे वास्तव्य 'गायत्री' या त्यांच्या निवास स्थानी होते व त्यांचे नित्याचे व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होते. जवळ जवळ दररोज संध्याकाळी सत्संग होत असे. कधी कधी गुरुदेव तो स्वतः संचालित करीत असत. पण शक्यतो ते एखाद्या प्रशिक्षकास तो संचालित करण्यास सांगत असत.

दि.४ जानेवारी रोजी गुरुदेव रात्री साडेअकरा वाजेपर्यंत चित्रपट पहात होते आणि त्यानंतरही त्यांना झोपावेसे वाटत नव्हते. नंतर सर्वांना समजले की त्यांची नात माधुरी यु.के.ला पोहोचण्याची ते वाट पाहत होते. शेवटी तिच्याशी बोलल्यावर रात्री साडेबारा वाजता ते झोपले.

गुरुदेवांनी आपले ई मेल पाहणे पुन्हा सुरु केले आहे. काही दिवशी तर ते त्यासाठी दोन दोन तासापर्यंत वेळ देतात. 'सिक्स्टी इयर्स इन द वाईल्ड' (जंगलातील ६० वर्षे) हा बी. बी. सी. वरील तीन भागातील लघुपट त्यांनी पाहिला व तो त्यांना खूप आवडला. जी जोडपी लग्न न करता नुसतीच एकत्र राहातात व त्यांना मुलेबाळे होतात पण नंतर जी लग्नाची बांधिलकी निभाऊ शकत नाहीत, अशा जोडप्यांच्या समस्यांबद्दल एके दिवशी गुरुदेव दुपारच्या भोजनाच्या वेळी बोलत होते. त्यांनी या प्रकारास फळ विकत घेण्याआधीच खाण्याची उपमा दिली. भारतातही हा प्रकार सर्व सामान्य होत चालल्याचा त्यांनी उल्लेख केला.

बुधवार दि.९ जानेवारी रोजी गुरुदेवांचे आश्रमात जाऊन सकाळी ९ चा सत्संग संचालित करण्याचे व काही लग्ने लावण्याचे नियोजन होते. पण प्रकृति अस्वस्थ असल्यामुळे ते आश्रमात जाऊ शकले नाहीत. त्यामुळे बंधू कमलेश यांनीं सत्संगाचे संचालन केले व विवाह संपन्न केले.

दूरदर्शनवरील 'चाणक्य' ही मालिका गुरुदेव पाहत असतात. त्यावर बोलताना गुरुदेवांनी सांगितले की, चाणक्याविषयी त्यांना विशेष माहिती नाही; पण तो खूप चांगला राजनीतिज्ञ असला तरी त्याचे बहुतेक सर्व कार्य हे सूड भावनेवर आधारित होते. गुरुदेवांनी पुढे सांगितले की सूड घेण्याची वृत्ती चांगली नसते.

दि.१४ जानेवारी, २०१३ – पोंगल

गुरुदेव भल्या पहाटेच तयार होऊन 'गायत्री'च्या बाहेर येऊन बसले. थंड हवा व धुके पाहून ते म्हणाले की चेन्नईतील हिवाळा संपण्याची वेळ येऊन ठेपली आहे. गुरुदेव आश्रमात येऊन पोहोचले आणि त्यांनी दृक्श्राव्य व माहिती–तंत्रज्ञान सुविधा केंद्रास अचानक भेट दिली. त्यांचे एक भाषण ध्वनिमुद्रित करण्यात आले व सत्संगानंतर ते ध्यानगृहात ऐकविण्यात आले.

गुरुदेवांनी एक तास दहा मिनिटांचा प्रदीर्घ सत्संग संचालित केला. संपूर्ण अंतर्लीन करणारे असे ते सत्र होते. त्यानंतर गुरुदेव तेजाने उजळल्याप्रमाणे दिसत होते. त्यानंतर गुरुदेव त्यांच्या कुटीराच्या नूतनीकरणाच्या कामाचे निरीक्षण करण्यासाठी गेले. दुपारच्या भोजनानंतर ते गायत्रीकडे रवाना झाले.

या दिवसाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे 'गायत्री' ला या दिवशी ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने सायंकाळी गायत्री येथे गणेश कुमारेश यांची संगीत मैफिल आयोजित करण्यात आली होती. गुरुदेवांनी सर्व गाण्यांचा आस्वाद घेतला. ते म्हणाले की हा त्यांच्यासाठी एक संस्मरणीय प्रसंग होता. सर्व पाहुण्यांना रात्रीच्या भोजनास थांबवून व सर्वांचे जेवण होईपर्यंत स्वतः थांबून त्यांनी एका उत्कृष्ट यजमानाची भूमिका पूर्णपणे पार पाडली.

पू. गुरुदेव, बरेचसे चित्रीकरण इस्तंबूलमध्ये झालेला एक चित्रपट पाहत होते आणि यावेळी गुरुदेव त्या शहरावर काम करीत असल्याचे पाहणाऱ्यांस जाणवत होते. दुसरे दिवशी इस्तंबूलमधील एक कुटुंब गुरुदेवांना भेटावयास आले व त्यांनी गुरुदेवांना तुर्कस्थानातील मिशनच्या प्रगतीबद्दल माहिती दिली. त्यांनी आपल्या सोबत काही फोटो आणले होते. गुरुदेव ते फोटो बारकाईने पाहत होते. आदल्या दिवशी पाहिलेल्या चित्रपटातील गोष्टींशी त्या फोटोंचा काही संबंध लागतो का हे ते पाहत होते.

त्रिचीला जाण्याच्या काही दिवस आधी प्रवासापूर्वी विश्रांती घेणे शक्य व्हावे म्हणून अभ्यागतांनी 'गायत्री'वर भेटावयास येऊ नये अशी विनंती गुरुदेवांनी केली होती. 'गुरुदेवांशी भेट' या विषयावरील परिसंवादास उपस्थित राहण्यासाठी युरोपातून सुमारे २०० अभ्यासी मणपक्कमला येणार असल्यामुळे त्यांचा त्रिचीचा दौरा पुढे ढकलावा लागला. सत्संग संचालित करण्यासाठी ते रविवारी आश्रमात गेले. तसेच परिसंवादाचे उद्घाटन करण्यासाठी ते सोमवारी पुन्हा आश्रमात गेले. त्यानंतर मंगळवारी सकाळच्या विमानाने त्यांनी त्रिचीकरीता प्रस्थान केले.

त्रिची येथे

गुरुदेवांच्या त्रिची भेटीची घोषणा होताच त्रिचीतील वातावरण हर्षोल्हासाने भाराऊन गेले. दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान प्रशिक्षकांसाठी एक परिसंवाद त्रिची येथील आश्रमात आयोजित करण्यात आला होता. भारत व विदेशातून आलेल्या ऐंशी सहभागींचे त्रिचीच्या छोटेखानी आश्रम परिसरात उत्साहाने स्वागत करण्यात आले. गुरुदेव दि. २२ रोजी त्रिचीला आले. त्यांनी २३ तारखेला सत्संगाचे संचालन केले. प्रशिक्षकांच्या कामासंबंधी तसेच सिटींग कशी द्यावी याविषयांवर त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. दि.२६ रोजी सत्संगानंतर त्यांनी 'बंधुत्व' या विषयावर व्याख्यान दिले. तसेच एकोप्याने कसे राहावे व ध्यान करण्यासाठी वेळेची निकड या बाबतीतही त्यांनी विवेचन केले.

दि. २७ रोजी गुरुदेवांनी संचालित केलेल्या सत्संगास जवळ जवळ १५०० अभ्यासी उपस्थित होते.

तंजावर येथील विशेष दिवस

तंजावर केन्द्रातील अभ्यासींनी ३८.८७ एकर जमीन संपादित केली आहे. त्यापैकी १२.५७ एकर मिशनच्या नावे नोंदणीकृत करण्यात आली असून उरलेली जमीन अभ्यासींच्या घरांसाठी भूखण्ड म्हणून देण्यात आली आहे. आश्रमाच्या जागेत ध्यानकक्ष, गुरुदेवांची कुटी, छोटेसे वसतिगृह, स्वयंपाक घर, स्नानगृहे व प्रसाधन कक्ष, इ. चे बांधकाम

अस्थायी स्वरूपात करण्यात आले आहे. गुरुदेवांना या केंद्रास थोडा वेळ का होईना भेट देण्याची खूप तीव्र इच्छा होती. परंतु त्यांच्या प्रवास करण्यावरील निर्बंध व प्रकृति अस्वास्थ्यामुळे ते तिथे जाऊ शकले नाहीत.

दि. ३० जानेवारीला सकाळी ८ वा. २० मि.नी गुरुदेवांचे त्रिची येथून तंजावर येथे आगमन झाले. ते अतिशय उल्हसित दिसत होते. तंजावर आश्रमात पाऊल टाकल्या क्षणापासूनच त्यांना आपल्या बालपणीच्या आठवणी येऊ लागल्या. तसेच आपल्या वाडवडीलांच्या कुटुंबात घडलेले प्रसंग आठवू लागले. न्याहारी झाल्यावर ते ध्यानकक्षाकडे चालत गेले व त्यांनी सत्संग संचालित केला. तो सुमारे ५० मिनिटे चालला. बंधू लिन्गुसामी (एक सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक) तमिळ मधून बोलले. चित्रपट व्यवसायाच्या तणावपूर्ण वातावरणात त्यांच्या जीवनाचे

संतुलन राखण्यासाठी त्यांना सहजमार्गाचे सहाय्य कसे झाले, या विषयी त्यांनी कथन केले.

गुरुदेवसुद्धा त्यानंतर तमिळमध्ये बोलले. ते म्हणाले की, त्यांचे आजारपण हे आपल्यासाठी आशीर्वादच ठरले कारण बाबूजी महाराजांकडून आपल्याला तेव्हापासून रोजच संदेश (Whispers from the Brighter World) मिळू लागले. जे अभ्यासी हे संदेश वाचतात त्या सर्वांना ते लाभदायक ठरले आहेत.

गुरुदेवांनी त्यांच्या कुटीरापासून ध्यानगृहापर्यंत व सत्संग व भाषणानंतर परत कुटीरापर्यंत चालत जाण्याचा निर्णय घेऊन सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्का दिला. त्यानंतर विश्रांती घेण्याऐवजी ते कुटीराच्या बाहेर बसले व दीड तास त्यांनी अभ्यासींशी संवाद साधला. पूर्वीप्रमाणेच त्यांनी अभ्यासींच्या प्रश्नांना उत्तरे दिली, एका तरुणीची एक दोन गाणी ऐकली व अभ्यासींनी दिलेल्या भेटी स्वीकारल्या. हे सत्र एवढ्या वेळ चालले की शेवटी गुरुदेवांनी विश्रांती घेण्यासाठी अभ्यासींनाच विनंती करावी लागली. आपल्या तेथील वास्तव्यात गुरुदेवांनी जमीनीचे नकाशे व आरेखने पाहिली व ध्यानगृहासाठी स्थान निश्चित केले. त्यांनी आश्रमभूमीवर एक फेरफटका सुद्धा मारला. भोजनानंतर काही स्वयंसेवकांना भेटल्यावर दुपारी २:३० वाजता ते त्रिचीकडे निघाले. त्यांच्या भेटीनंतर आश्रमातील वातावरण आनंदाने भरून गेल्याचे सर्व अभ्यासींना जाणवत होते.

शनिवार २ फेब्रुवारी, २०१३

लालाजी महाराजांच्या जयंती दिवशी गुरुदेव सत्संग संचालित करण्यासाठी आश्रमात आले. मुख्य प्रवेशद्वारापासून ते ध्यानगृहापर्यंतच्या मार्गावर थांबलेल्या सर्वांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर त्यांनी सत्संगाचे संचालन केले. त्यासाठी १००० हून अधिक अभ्यासी उपस्थित होते. त्यानंतर गुरुदेवांनी दोन लग्ने लावली व नंतर बंधू पी. आर. कृष्णा यांनी व्हीस्पर्स मधील एक नवीन संदेश इंग्रजीत वाचून दाखविला. तोच संदेश पुन्हा रशियन व फ्रेंच मधून वाचून दाखविण्यात आला. संदेश कोणत्या भाषेत प्राप्त होतात त्याबाबत सांगताना गुरुदेव म्हणाले की त्यांच्या गुरुदेवांच्या हृदयातून निघणाऱ्या तरंगांशी ज्याचे सूर जुळतील त्या कोणासही असे संदेश प्राप्त होऊ शकतील आणि त्या संदेशांची भाषा असेल हृदयाची भाषा. तेथे वाचून दाखविण्यात आलेल्या संदेशात आपल्या सद्गुरुंच्या जन्मोत्सवासारख्या समारंभांमुळे अभ्यासींवर होणाऱ्या परिणामांच्या महत्वावर जोर देण्यात आला होता.

गुरुदेवांनी सत्योदय या ग्रंथाच्या पहिल्या ध्वनिफीतीचे विमोचन केले. त्यानंतर गुरुदेव जानकी फार्म कडे परतले.

कुटीमध्ये पोहोचल्यावर त्यादिवशीच्या सत्संगाविषयी गुरुदेव बोलत होते तेव्हा ते म्हणाले की, "आजचा सत्संग अतिशय खास होता." हे सांगताना गुरुदेवांचा चेहरा उजळून गेला होता.

बंधू कमलेश यांनी सर्व विदेशी अभ्यासींना संध्याकाळी होणाऱ्या बंधू शशांक यांच्या बासरी वादनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे व त्यानंतर जानकी फार्मवर रात्रीच्या भोजनाचे आमंत्रण दिल होते. १०० पेक्षा अधिक अभ्यासींचा समूह कार्यक्रमास उपस्थित होता. गुरुदेव काहीसे थकले असल्यामुळे शयनकक्षातच थांबले व तेथूनच त्यांनी ९० मिनिटांचा मनमोहक कार्यक्रम ऐकला. कार्यक्रमानंतर गुरुदेव वादकांना भेटले व काही वेळ त्यांच्याशी बोलले.

रविवार दि. ३ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी छोटयाश्या सत्संगाचे संचालन केले. ते थोडेसे थकले असल्यामुळे ते भाषण देऊ शकणार नाहीत असे त्यांनी सांगितले. पण जेव्हा त्यांना सांगण्यात आले की युरोपीय अभ्यासी मणपक्कमहून केवळ एक दिवसासाठी आलेले आहेत, तेव्हा गुरुदेवांनी त्या सर्व अभ्यासींना दुपारच्या जेवणासाठी जानकी फार्मवर बोलाविले. यामुळे अनेकांचे डोळे पाणावले होते. ते सर्वजण वेळेत परत निघू शकतील याबाबत ही गुरुदेव नेहमीप्रमाणेच दक्ष होते.

गुरुदेवांची तब्येत जरा नरम गरमच होती व संध्याकाळपर्यंत त्यांच्यावर काही उपचार ही करण्यात आले. गुरुदेव पुन्हा वेदना व यातनांना हसतमुखाने कसे सामोरे जावे या विषयी बोलू लागले. त्यांना होणाऱ्या वेदना प्रत्येकालाच दिसत होत्या पण तरीही ते 'बोले तैसा चाले' या उक्ति

प्रमाणे हसतमुख होते.

आठवडयाच्या शेवटी त्रिची आश्रम बऱ्यापैकी रिकामा झाला होता. यावेळी सुमारे ४० रशियन अभ्यासी आले होते. पू. गुरुदेवांनी त्यांना आपल्या कुटीरामध्ये आमंत्रित केले व त्यांना सिटींग दिली तसेच त्यांच्याबरोबर काही वेळ व्यतित केला.

गुरुदेव उन्हात बसले असता चीन आणि तुर्कस्थानातील काही अभ्यासी त्यांच्याजवळ येऊन बसले. उन्हाची तीव्रता वाढताच गुरुदेव व्हरांड्यातील झोपाळ्यावर येऊन बसले. बराच वेळ बसून राहिल्याने, तसेच चर्चा, सिटिंग इत्यादींमुळे ते थकल्यासारखे दिसत होते. डॉक्टर त्यांना विश्रांती घेण्याची विनंती करत होते. त्यानंतर त्यांनी बाबूजी महाराजांविषयी बोलण्यास सुरुवात केली आणि त्याक्षणी सर्वांनी त्यांच्यामध्ये ऊर्जेचा स्त्रोत पाहिला. गुरुदेवांना बोलताना पाहणे हा त्यांच्या भोवताली असणाऱ्या सर्वांसाठी आनंददायी काळ होता. गुरुदेवांचे काही बोल येथे उद्धृत करीत आहोत. "ईश्वर आपल्याला भेटवस्तू आणि अडचणी एकत्रपणे देत असतो. त्या भेटवस्तूंच्या साहाय्याने अडचणींवर मात करणे आपले काम आहे." "विकसित मनाचे हे वैशिष्ट्य आहे की ते आधीपासून काही विचार करीत नाही. वर्तमानात ते योग्य वेळी, नेमकेपणाने काम करते. केवळ सुशिक्षित आणि बुध्दीवान मनच आधीपासून विचार करते आणि बेत वगैरे आखते."

सायंकाळी गुरुदेवांना खूप वेदना जाणवू लागल्या आणि ते अतिशय थकून गेले होते. त्यामुळे त्यांच्यावर काही उपचार करावे लागले. रात्रीच्या भोजनानंतर काही युरोपीयन अभ्यासी परत निघाले होते त्यांना गुरुदेव भेटले. त्या सगळ्यांना गहिवरून आले होते. केवळ गुरुदेवांच्या सहवासाने सगळ्यांची मने हेलावून गेली होती. एका वयोवृद्ध महिलेने गुरुदेवांना सांगितले की तिच्या नातीने गुरुदेवांना शुभेच्छा पाठविल्या आहेत. गुरुदेवांनी तिच्या नातीसाठी खास एक भेटवस्तू देऊ केली. त्या भगिनीच्या भावना अनावर झाल्या व त्यांच्या डोळ्यात अश्रु आले. ते पाहून तेथे उपस्थित असलेल्या सर्वांचीच मने हेलावून गेली. गुरुदेवांचे हे प्रेमाने, दयाभावाने आणि मृदुतेने ओथंबलेले आचरण आपण सर्वांनी अनुसरले पाहिजे.

गुरुदेवांची प्रकृति बिघडल्याने ते एक दिवस आधीच चेन्नईला रवाना झाले. गुरुदेवांनी मंगळवारी सकाळी ११ वाजता त्रिचीहून प्रस्थान केले. वाटेत ते विल्लुपुरम येथे थांबले.

विल्लुपुरम केंद्राच्या अभ्यासींना गुरुदेवांच्या येण्याची कल्पना दिली गेली असल्याने त्यांनी गुरुदेवांच्या स्वागताची तयारी केली होती. गुरुदेव १२:३० वाजता तेथे पोहोचले. तेथे त्यांनी अर्धा तास सत्संगाचे संचालन केले. अभ्यासींबरोबर गप्पा मारल्या व भोजन केले. त्यांनी आश्रमाचे 'तपोनिधी' असे नामकरण केले .त्यानंतर दुपारी ३ वाजता ते चेन्नईला रवाना झाले.

चेन्नईला पोहोचताच ते तपासणीसाठी आरोग्यकेंद्रामध्ये गेले. ते खूप थकलेले असल्याने लवकरच झोपी गेले.

एका दुपारी 'गायत्री' येथे गुरुदेव सहजमार्गात बराच काळ व्यतीत केलेल्या काही युरोपियन युवा अभ्यासींशी बोलत होते. त्यांनी त्या अभ्यासींना एक एक सफरचंद देऊ केले आणि सांगितले की एकदा बाबूजी महाराजांनी त्यांनी काही दिवसांसाठी उपास करण्यास सांगितले होते आणि त्यानंतर त्यांनी गुरुदेवांना एक सफरचंद देऊ केले होते. गुरुदेव सुरी शोधित होते त्यावर बाबुजींनी त्यांना सुरीची कशासाठी आवश्यकता आहे असे विचारले. गुरुदेव म्हणाले की ते इतरांबरोबर वाटून खाऊ इच्छितात. त्यावर बाबूजी महाराज म्हणाले, " प्रत्येकाला कसे द्यायचे ते मला माहीत आहे. तू खावेस म्हणूनच मी हे तुला दिले आहे." अशा रितीने गुरुदेवांनी सफरचंद हे प्रत्येकाने खावे यासाठी दिले आहे, वाटण्यासाठी नाही हा संदेश दिला.

रशियन आणि द. अमेरिकेतील अभ्यासींसाठी चर्चासत्राचे आयोजन

रशियन भाषिक अभ्यासी भारतात येण्याचे हे सलग तिसरे वर्ष होते. रशियातून ७५० तर द. अमेरिकेतून १५० अभ्यासी मणपाक्कम येथे जमले होते. दि. ९ फेब्रुवारी रोजी चर्चासत्राच्या पहिल्या दिवशी, गुरुदेव त्यांच्या कुटीराच्या नूतनीकरणाचे काम पाहण्यास गेले असता तेथील धुळीमुळे त्यांना त्रास झाला. म्हणून त्यांनी अभ्यासींना ध्यानगृहातून निवास कक्ष 'अ' येथे येण्यास सांगितले आणि तेथे छोटा सत्संग संचलित केला. त्यानंतर लगेच ते गायत्रीला रवाना झाले.

'प्रेम आणि समर्पण' हा या चर्चासत्राचा विषय होता. सर्व कार्यक्रमांमध्ये एकत्रितपणे सहभागी झालेले असताना देखील सर्वांवर काम मात्र वैयक्तिक स्तरावर झालेले दिसून येत होते. गुरुदेवांच्या प्रेमाने संपूर्ण आश्रमाला व्यापले होते. गुरुदेवांच्या दूरदृष्टीवर अभ्यासींना आत्मपरीक्षण करण्यास सांगितले गेले व त्या अनुषंगाने आपले जीवन कसे व्यतीत करावे यावर विचार करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

बंधू कमलेश पटेल, ए.पी दुराई, सी. राजगोपालन, पी. आर. कृष्णा, बिल वेकॉट, समीर सिंह आणि एन. एस. नागराजा यांच्या रोचक आणि प्रेरणादायी भाषणांनी सहभागी बंधु–भगिनींना खूप शिकण्यास मिळाले. प्रेम आणि समर्पण, ईश्वरीय तत्वे, सेवा हेच जीवन, सहजमार्गाचे प्रमुख

तत्व, माझ्या जीवनात सहजमार्ग इ. विषयांवर भाषणे झाली. दररोज दुपारी समन्वयक अभ्यासींचे गट करून दिवसभरातील भाषणांविषयी चिंतन व उजळणी घेत असत.

दोन भिन्न खंडातील सहभागी बंधू–भगिनी चटकन व सहजतेने एकमेकांशी जोडले गेले आणि त्यांनी संयुक्तपणे वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. दोन्ही खंडातील युवा अभ्यासींनी एक गाणे ध्वनिमुद्रित करुन गुरुदेवांना भेट दिले.

दि. १७ फेब्रुवारी या शेवटच्या दिवशी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व सर्व सहभागी बंधू भगिनींना दुपारच्या जेवणासाठी आमंत्रित केले. ही गुरुदेवांकडून खूपच खास भेट होती. यावेळी एका छोट्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. हे एक रशियन लोकगीतावर आधारीत नृत्य होते. मिश्रभाषिक गाणीही या वेळी सादर करण्यात आली. 'विश्व' ही एक न संपणारी सुरुवात आहे' असे गुरुदेवांनी यावेळी सांगितले. गुरुदेवांनी नुकत्याच आलेल्या 'व्हिस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड' मधील एका संदेश उधृत केला ज्यामध्ये बाबूजी महाराजांनी म्हटले आहे की मिशनमधील काही अभ्यासी या जीवन काळातच अंतिम ध्येयापर्यंत पोहोचले आहेत. प्रेम आणि समर्पण या प्रमुख आध्यात्मिक गुणांद्वारे आपल्याला याच जीवनकाळात ध्येय गाठण्यासाठी मार्गदर्शक आणि संधी उपलब्ध असल्याची आशा निर्माण झाली आहे.

प्रशिक्षक निर्माणाच्या कार्यात गुरुदेव बरेच व्यस्त होते. या सत्राबरोबरच शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमही चालू होता. त्यामुळे केवळ दोन आठवड्यात ३६ प्रशिक्षक बनविण्याचे काम गुरुदेवांनी यावेळी केले. ते दिवसाकाठी ३ प्रशिक्षकांना सिटिंग देत असत. त्यामुळे त्यांची खूपच शक्ती खर्ची पडत असे.

शुक्रवार दि.१५ फेब्रुवारी, बसंत पंचमी

गुरुदेव खरेतर बरेच थकलेले दिसत होते तरीही ते वेळेआधी तयार झाले. त्यांनी सकाळी आश्रमात सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर जोराचा पाऊस सुरु झाला. गुरुदेवांनी याप्रसंगी या दिवसाचे महत्त्व आणि लालाजी महाराजांचे भूतलावरील अवतरण यांचे स्मरण करून देणारे भाषण दिले. ते म्हणाले की, जेव्हा सत्संग सुरु झाला तेव्हा आपल्याला माहीत नव्हते की पाऊस पडणार आहे पण पाऊस पडला. अशा प्रसंगी पर्जन्यवृष्टी होणे शुभ आहे म्हणून आपण त्याचे स्वागत केले पाहिजे.

यानंतर गुरुदेवांनी बंधू सतबीर यांच्या गार्डन ऑफ हार्टस येथील सदनिकेतील त्यांच्या दालनाचे उदघाटन केले. त्याचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले होते. त्यांनी तेथे रविवारपर्यंत राहण्याचे ठरवले. गुरुदेव सिटिंग देण्यात व्यस्त होते. त्यांचा घसा खवखवत होता, ते शरीराने थकलेले होते पण त्यांचे काम मात्र चालूच होते. रविवारी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. हा सत्संग १ तास २० मिनिटे चालला. त्यानंतर ते तळघरातील सभागृहात गेले व द. अमेरिकेतील अभ्यासी आणि शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी अभ्यासी यांच्यासमवेत न्याहारी केली. नंतर ते पुन्हा सतबीरच्या घरी गेले. जरी ते थकलेले होते तरीही त्यांनी सिटिंग्स दिली आणि त्यांचे काम पूर्ण केले. एका अभ्यासीने त्यांना 'ते एव्हढे स्वत:ला का त्रास करुन घेत आहेत?' असे विचारले. यावर ते उत्तरले "जेव्हा मला बरे वाटत नसते तेव्हा ठीक

आहे पण आता मी बरा आहे. मला माझे कर्तव्य केले पाहिजे अणि प्रशिक्षकांना सिटिंग देणे माझे एक कर्तव्य आहे."

गुरुदेवांचे कार्य चालूच आहे. ते कधीच संपत नाही. आपण प्रार्थना करूया की त्यांचे आरोग्य चांगले राहावे आणि ते नेहमीसारखे तेजस्वी व प्रबल राहावेत.

नवीन प्रकाशने



सहजमार्ग मिंडरींग्ज (इंग्रजी)



फेथ (इंग्रजी)



धर्म आणि अध्यात्म

हृदयीचे बोल २००९ (हिंदी)



प्रेम आणि मृत्यु

डाऊन मेमरी लेन खंड १ ला (तामिळ)



कोळ्याचे जाळे खंड १ (इंग्रजी)

समग्र संदेश भाग २ (हिंदी)

सत्योदय ध्वनिमुद्रित पुस्तक (इंग्रजी)

पूज्य लालाजी महाराजांचा १४० वा जयंती उत्सव

उत्तर

गुरगाव व उत्तर प्रदेशातील अलाहाबाद, बलिया, कानपुर, लालगंज, लखनौ, गोला गोकर्णनाथा इ. अनेक केंद्रांमध्ये पूज्य लालाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. झोन क्र.१० मधील चंदिगढ, सोनेपथ, पटीयाळा आणि भवानी ह्या केंद्रामध्येसुद्धा हा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी अभ्यासी बंधू भागिनी तीनही दिवस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पूर्व

कोलकाता, सिलिगुरि व खरगपूर या ठिकाणी जयंती समारंभ साजरा करण्यात आला. यामध्ये जवळपासच्या केंद्रांमधील अभ्यासी सामील झाले होते. येथे भाषणे, स्व–परीक्षणासाठी वेळ व सांस्कृतिक कार्यक्रम असा भरगच्च कार्यक्रम ठेवला गेला होता. ह्या कार्यक्रमाद्वारे सहजमार्गाची पूर्ण व सखोल समज यावी हा यामागील उद्देश होता.

दक्षिण

आंध्रप्रदेश मधील कर्नुल व विजयवाडा या केंद्रामध्ये तीन दिवसांची सम्मेलने आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये अभ्यासींच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी गट चर्चा, सादरीकरणे, प्रश्नमंजूषा अणि ध्वनि–चित्रफीति दाखविण्यात आल्या. कर्नाटकातील बेंगलोर, कोलार, मंगलुर, चेन्नापट्ना, गुलबर्गा, हुबळी, बीदर आणि रायचूर ह्या केंद्रांमध्ये हा सोहळा साजरा केला गेला. आजूबाजूच्या केंद्रांतील अनेक अभ्यासी त्यात सहभागी झाल होते. ह्या उत्सवात अनेक भाषणे व गट–चर्चा झाल्या. निबंध लेखन स्पर्धेच्या प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. केरळमध्ये त्रिवेन्द्रम, अलुवा व पय्यानूर ह्या केंद्रांमध्ये हा सोहळा आयोजित केला होता. तामिळनाडूमध्ये मदुराई येथे ह्या उत्सवाला २०० अभ्यासी उपस्थित होते.

> "आनंद हा कुठे बाहेर नाही. तो आपले लक्ष चित्तप्रवृत्तीच्या स्थिरतेवर केंद्रित करण्यात आणि अंतर्मुख होण्यात आहे. ज्यांना हे गुपित कळले त्यांना आनंदाचा शोध कुठे बाहेर घेण्याची आवश्यकता नाही."
>
> पूज्य लालाजी महाराज

पश्चिम

गुजरातमधील अहमदाबाद, महाराष्ट्रामध्ये नागपूर, सोलापूर, मुंबई आणि राजस्थानातील अलवार व जोधपुर ह्या भारतातील पश्चिम भागात लालाजी महाराजांच्या जन्मदिवसानिमित्त समारंभ आयोजित केले गेले होते.

अलुवा

बिकानेर

मंगलुर

गुलबर्गा

हुबळी

भीलवाडा

अहमदाबाद

चेन्नापट्ना

मुंबई

मिर्झापुर

कानपुर

नागपुर

विजयवाडा

अलाहाबाद

फुलगाव

कर्नूल

वाराणसी

लखनौ

कोलकाता

बेंगलोर

परिसंवाद

विभागीय संमेलन कोलकाता

दि.५ व ६ जानेवारी रोजी पश्चिम बंगालमधील विविध केंद्रांमधील सुमारे सत्तर अभ्यासी (कोलकाता) आश्रमामध्ये जमले होते. अशा संमेलनांना उपस्थित असणाऱ्या अभ्यासींना आध्यात्मिकतेने भारलेल्या वातावरणाचा लाभ घेण्याची संधी मिळते, कारण या विभागात कोलकाता आणि सिलिगुरी हे दोनच आश्रम आहेत आणि गंगटोक येथील तिसरा आश्रम पूर्णत्वास येत आहे.

सत्संगानंतर बंधू महेश भारद्वाज आणि बंधू जेसल मेहता यांनी 'सहजमार्गाची मूलतत्त्वे' या विषयावर सादरीकरण केले. यानंतर बंधू शरद झावर आणि भगिनी लीना दवे यांनी 'ध्यान' आणि 'सफाई' याविषयांवर सत्रे संबोधित केली. दुर्गापुर येथील बंधु परिमल जना यांनी सादर केलेल्या 'प्रार्थना' याविषयावरील सत्र आणि खरगपुर येथील भगिनी चंदरकांता अरोरा यांनी सादर केलेल्या 'दैनंदिनी लेखन' याविषयावरील रोचक सत्राने दुपारी जेवणानंतरच्या भागाची सुरुवात झाली.

रात्री कोलकात्याच्या शंभराहून अधिक अभ्यासींनीसुद्धा आश्रमामध्येच वास्तव्य केले. पुढील दिवशी सकाळच्या सत्संगानंतर केंद्रप्रमुख बंधू अजय भट्टर यांनी ध्येयाप्रती गंभीर होऊन, त्यासाठी प्रयास करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. अभ्यासींना या दोन दिवसीय सत्राबाबतचे त्यांचे अनुभव कथन करण्यास सांगण्यात आले. गुरुदेवांवरच्या प्रेमामुळे हृदये जोडली गेल्याचा अनुभव घेऊन आणि सुखद आठवणींसह सर्वांनी निरोप घेतला.

प्रकाशन कार्यशाळा, हुबळी

बेंगलोर येथील बंधू वेंकट राव आणि त्यांच्या चमूने दि. १९ ते २० जानेवारी दरम्यान, हुबळी केंद्रामध्ये हुबळी, सिरसी, गदग, नवनगर, करुर, राणीबेन्नूर, धारवाड, दावणगिरि आणि बेळगाव या ठिकाणाहून आलेल्या सुमारे पंचेचाळीस सहभागींसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दि. १९ जानेवारी रोजी बंधू वेंकट यांनी 'सेवा' या विषयावर श्रोत्यांना संबोधित केले. गुरुदेवांच्या भाषणांमधील या विषयाचे महत्त्व स्पष्ट करणाऱ्या चित्रफीतींचे भाग सादर करण्यात आले. सहभागींना दोन गटात विभागण्यात आले आणि विविध विषयांवरील नाटिकांमध्ये अभिनय करण्यासाठी सांगण्यात आले. (मिशनच्या साहित्याच्या) विक्रीच्या प्रक्रियेची पद्धत स्पष्ट करण्यात आली. दुसऱ्या दिवशी 'मिशनचे साहित्य वाचनाचे महत्त्व' हा विषय हाती घेण्यात आला. सकाळी ६ वाजता पुस्तके विक्री कक्ष उभारणी करण्याचे स्वयंसेवकांना सांगण्यात आले. पुस्तके विक्री कक्ष उभारणी आणि प्रत्यक्ष विक्री करताना स्वयंसेवकांच्या उत्साहाला सीमा नव्हती. आश्चर्यकारकरित्या सुमारे ४८,००० रु. किमतीच्या पुस्तकांची विक्री झाली. कार्यशाळेची समाप्ती सायंकाळी ५ वाजता सत्संगाने आणि प्रतिक्रिया सत्राने झाली.

अभेदोनपुरा, उत्तर प्रदेश

दि. १७ फेब्रुवारी रोजी अभेदोनपुरा येथील एका शाळेच्या इमारतीमध्ये सुमारे १५० सहभागींसाठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, सहभागींमध्ये शाळेचे व्यवस्थापकीय कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक अभ्यासींचा समावेश होता. बंधू सुभाष चंद्रा हे या कार्यक्रमाचे समन्वयक होते.

बंधू आर. एस. इंदोलिया यांनी सहज मार्गाची ओळख करुन दिली आणि मानवी उत्क्रांतीमध्ये ध्यानाची भूमिका स्पष्ट केली. 'आधुनिक जीवनात सहजमार्गाचे स्थान' या विषयावर बंधू जी. एस. गिल यांनी उपस्थितांना संबोधित केले. एका प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले की आपण ध्यानातून एकाग्रता साध्य करु शकतो पण ध्यान करण्याचा हा एकच उद्देश नाही.

'धर्म आणि अध्यात्म' याविषयावर भगिनी उषा गिल यांनी भाष्य केले आणि यानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले. श्रोत्यांनी सहजमार्ग तत्त्वज्ञानावरील पुस्तके विकत घेतली आणि संमेलनाच्या शेवटी जेवणाचा आस्वाद घेतला.

निबंध स्पर्धेच्या प्रशस्तिपत्रकांचे वितरण

अखिल भारतीय निबंध स्पर्धा, २०१२ च्या विजेत्यांना प्रशस्तिपत्रकाचे वितरण करण्याचे कार्यक्रम भारतभरातील विविध केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आले.

दि. ३ फेब्रुवारी रोजी तिरुप्पूरच्या चेट्टीपालयम आश्रमामध्ये बंधू एन. प्रकाश, विभाग प्रमुख बंधू टी. व्ही. विश्वनाथ राव व तिरुपूरचे केंद्रपप्रमुख बंधू एस. रवी सुब्बिअन यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

दि. ३ फेब्रुवारी रोजी गुलबर्गा व दि. १० फेब्रुवारी रोजी हुबळी येथे हे कार्यक्रम आयोजित केले गेले होते. धारवाड जिल्ह्याचे डी.डी.पी.आई. श्री वर्धन हुबळीच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे होते. बेळ्ळारी येथे ए.एस.एम. महिला महाविद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. तेजस मूर्ती के. हे प्रमुख पाहुणे होते. बीदर व राइचूर येथे दि. ३ फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. कर्नाटकाच्या दक्षिण विभागासाठी बेंगलोर केंद्राने दि १० फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये भगिनी सीता कुंचितपादम यांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार केला गेला.

तामिळनाडूच्या उत्तर विभागाने त्रिची येथे हा कार्यक्रम आयोजित केला होता. आत्मा हॉस्पिटल व संशोधन केंद्राचे संचालक व अध्यक्ष डॉ. के. रामक्रिष्णन हे प्रमुख अतिथी होते. मुरादाबाद येथे हा कार्यक्रम दि.१७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला होता.

मुंबई व नासिक केंद्रांसाठी बी. एम. ए. पनवेल येथे दि. १० फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भारत सरकारच्या परदेशी व्यापार विभागाच्या अतिरिक्त निर्देशिका डॉ. कविता गुप्ता यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. भगिनी अनुराधा व बंधू संजय भाटिया हे आदरणीय अतिथी होते.

कलकत्त्यामधील बी.एम.ए. येथे मुंबई व कोलकाता उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चित्ततोष मुखर्जी यांनी विजेत्यांना पारितोषिके प्रदान केली. बंधू अजय भट्टर यांनी या निबंधलेखनादरम्यान आलेले विचार व कल्पनांना विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनामध्ये अनुसरण्याच्या गरजेवर भर दिला जेणेकरून या निबंधलेखन स्पर्धेला खरा अर्थ प्राप्त होईल.

सिलिगुरी, दार्जिलिंग व गंगटोकचे निमंत्रित दि. २७ जानेवारी रोजी सिलिगुरी येथे एकत्रित जमले. ज्ञानज्योती महविद्यालयाचे मुख्याध्यापक व युनेस्कोचे सल्लगार प्रा. जयरामन सुरेश हे आदरणीय अतिथी होते.

चंदिगढ

गोबिचेट्टीपलयम

मुंबई

तिरुप्पूर

गुलबर्गा

तुतिकोरीन

त्रिची

सिलिगुडी

बेळ्ळारी

कोलकाता

मुरादाबाद

गुरगाव

कुरनूल आश्रमाच्या जमिनीची नोंदणी

दि. २७ डिसेंबर रोजी श्री रामचंद्र मिशनचे सहसचिव बंधू ए. पी. दुराई यांचे कुरनूल येथे जमिनीच्या नोंदणीसाठी आगमन झाले. आश्रमासाठी १० एकर आणि अभ्यासींच्या कॉलनीसाठी ३० एकर अशी जमिनीची विभागणी आहे. सत्संग झाल्यानंतर त्यांनी बस्तिपदू गावच्या हद्दीत, कुरनुलपासून सुमारे १३ किलोमीटरवर असणाऱ्या नवीन आश्रमाकडे प्रस्थान केले. बंधू दुराई 'गुरुदेवांना नेहमी आनंदित कसे ठेवावे?' या गट–चर्चेत सहभागी झाले. सादरीकरणांनंतर 'मानवजातीत खऱ्या अर्थाने बंधुत्व निर्माण करण्यासाठी आपसातील मतभेदांचा आणि भेदभावांचा त्याग करण्याची आवश्यकता आहे' या विषयावर ते बोलले. 'आपल्या आश्रमांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे हाच गुरुदेवांना खऱ्या अर्थाने आनंदी बनविण्याचा मार्ग आहे' असे त्यांनी सुचविले. दुपारच्या जेवणानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रादरम्यान सहजमार्ग साधनेविषयी स्पष्टीकरणे देण्यात आली.

संध्याकाळच्या सत्संगानंतर अध्यापकांसाठी एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये साठ अध्यापकांनी भाग घेतला. यामध्ये नंदयाल आणि नंन्दिकोटकुर इतक्या दुरुन आलेल्या काही शिक्षकांचासुद्धा समावेश होता. आंध्रप्रदेश किनारपट्टी विभागप्रमुख बंधू मधू कोथापल्ली हेही कार्यक्रमास उपस्थित होते.

दि.२८ डिसेंबर रोजी सत्संग झाल्यानंतर विक्रीपत्राचे नोंदणीकरण झाले. या चमूने नंतर सुमारे २०० अभ्यासी उपस्थित असणाऱ्या आश्रमाच्या नवीन ठिकाणाकडे प्रस्थान केले. काही युवा अभ्यासींना बोलण्यास सांगण्यात आले त्यानंतर केंद्रप्रमुख बंधू रविंद्रनाथ, विभागप्रमुख बंधू गंगाधर आणि काही इतरांचीही भाषणे झाली. बंधू दुराई यांनी जलद गतीने अभ्यासींच्या वसाहतीची उभारणी करण्यासाठी आणि आश्रमाच्या बाजूला अभ्यासींचा समुदाय बनविण्याविषयीची गुरुदेवांची मार्गदर्शक तत्वे सर्वांपर्यंत पोहोचविली. या सत्राची सांगता सत्संगाने झाली.

सोलापूर आश्रम, महाराष्ट्र

दि. ३० डिसेंबर रोजी थेट प्रक्षेपणाद्वारे गुरुदेवांनी सोलापूर येथील ध्यानगृहाचे उद्घाटन केले. सोलापूरच्या आश्रमाची जागा शहरापासून केवळ ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अक्कलकोट रस्त्यावर १.५ एकर इतकी आहे. ध्यानगृह जवळ जवळ ३५०० चौ. फूट असून त्यामध्ये ८५० अभ्यासींची क्षमता आहे. कडुलिंब आणि पिंपळासहित ५०० च्या आसपास असलेल्या विभिन्न प्रकारच्या झाडांनी आश्रमाच्या परिसराला हिरवेगार केले आहे. त्यामुळे गुरुदेव अतिशय प्रसन्न झाले. चित्रफीत पाहताना गुरुदेवांनी आश्रमाच्या जागेबद्दल सखोल चौकशी केली. २३ वर्षांपूर्वी गुरुदेवांच्या सोलापूर भेटीदरम्यान ते टेलिफोनच्या उंच इमारतीपर्यंत चालत गेले होते आणि टेलिफोन कार्यालयातून आपल्या चेन्नई येथील कुटुंबियांशी बोलले होते याची त्यांना आठवण झाली. व्हिडिओ पाहिल्यानंतर गुरुदेवांनी हा आश्रम पूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केला. या अत्यंत आनंदाच्या प्रसंगी त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या सोलापूरच्या अभ्यासींमध्ये प्रसादाचे वाटप केले.

मुरादाबाद

बंधू राज किशोर यांनी दि. २७ जानेवारी रोजी मुरादाबाद आश्रमामध्ये अठ्ठेचाळीस अभ्यांसींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. छोट्या गटांकरीता चार सत्रे आयोजित करण्यात आली. पहिल्या सत्रामध्ये आत्मपरिक्षण आणि आंतरिक जागरुकता यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. गुरुदेवांची अवतरणे आणि शिकवणूक यांचा विषयाचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्रामुख्याने उपयोग करण्यात आला. दुसरे सत्र हे मुख्यत्वेकरुन ध्यानाच्या सर्व अंगांबद्दल होते आणि त्यामध्ये दृक उपकरणांच्या मदतीने विवरण देण्यात आले. 'विस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड' मधील या विषयावरील काही निवडक संदेशांचाही यात समावेश होता.

तिसऱ्या सत्रामध्ये सांघिकरित्या काम करण्यावर प्रकाशझोत टाकण्यात आला. सांघिकरित्या कार्य करण्याचा प्रत्यक्ष अनुभव यावा यासाठी अभ्यासींचे जोड्यांमध्ये वर्गीकरण करुन त्यांना कामेही आखून देण्यात आली. चहापानाच्या छोट्या सुटीनंतर शेवटच्या सत्रामध्ये व्हिडिओ सादरीकरण होते आणि त्यावर आधारीत आंतरीक चिंतन यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी प्रत्येक अभ्यासीने कार्यक्रमाबद्दल आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आणि कार्यक्रमादरम्यान आलेल्या अनुभवांचे कथन केले.



त्रिची

दि.४ फेब्रुवारी रोजी भारथिडासन विद्यापीठ, सुरियार, त्रिची येथे एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. द्विपदवीधारक, संशोधक विद्यार्थी, तांत्रिक अधिकारी आणि अध्यापक अशा विविध विभागांमधून मिळून साठ जणांनी यात भाग घेतला.

श्रीमति ॲना जोइस यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि श्री रामचंद्र मिशनचे उपाध्यक्ष बंधू कमलेश पटेल यांचा सर्वांना परिचय करुन दिला. बंधू कमलेश यांनी ध्यानाचे महत्व आणि त्यामागचे विज्ञान यावर भर देत उपस्थितांना संबोधित केले. या सत्रानंतर त्यांनी काही सहभागींबरोबर संवाद साधला. त्यापैकी अनेक जणांनी सहजमार्ग साधनापद्धतीत सहभागी होण्यात रस दाखविला.

दि.१२ फेब्रुवारी रोजी भारथिडासन विद्यापीठ, त्रिची येथे वनस्पतीशास्त्र विभागाच्या सभागृहात एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, शिष्यवृत्तीधारक संशोधक, सागरी जैव–तंत्रज्ञान (मरिन बायोटेक्नोलोजी), आणि सागरी विज्ञान (मरिन सायन्स) विभागाचे सदस्य अशा जवळपास पन्नास व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. त्रिचीचे केंद्रप्रमुख बंधू टी. एस. रघुराम यांनी जमलेल्यांना संबोधित केले. विद्यार्थ्यांनी ध्यानपद्धतीच्या स्पष्टीकरणास्तव त्यांच्याशी विचारांची देवाण–घेवाण केली आणि काही विद्यार्थ्यांनी ध्यानपद्धतीचा अनुभव घेण्यात रस दाखविला.

गोला गोकर्णनाथ, उत्तर प्रदेश

दि.२० जानेवारी रोजी विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील सुमारे ११० अध्यापकांसाठी गोला गोकर्णनाथ केंद्र, उत्तर प्रदेश येथे विभागप्रमुख बंधू प्रभात यांनी एक कार्यशाळा आयोजित केली होती. भगिनी सुजाता यांनी 'स्व–केंद्रितपणा : तत्व आणि पद्धती' या विषयावर आणि बंधू पंकज यांनी 'आधुनिक समाजातील अध्यापकांची भूमिका' या विषयावर श्रोत्यांना संबोधित केले. दुपारच्या जेवणानंतर बंधू हेमराज यांनी 'आजच्या युवकांच्या समस्या आणि त्यांवरील उपाय' यावर विवेचन केले. अध्यापकांनीही त्यांच्या अनुभवांची देवाण–घेवाण केली. कार्यशाळा अतिशय उत्तमरित्या आयोजित करण्यात आली होती आणि सुमारे चाळीस स्वयंसेवकांनी ही यशस्वी करण्यात योगदान दिले.

केरळ दौरा

सह–सचिव बंधू ए. पी. दुराई यांनी मुख्यत्वेकरुन शैक्षणिक संस्थांमध्ये खुली सत्रे व चर्चासत्रे आयोजित करण्यासाठी म्हणून पूर्ण केरळभर प्रवास केला. दि. १७ व १८ जानेवारीस त्यांनी त्रिवेंद्रम येथील सैनिक शाळा आणि विद्यापीठ महाविद्यालयापासून सुरुवात केली. दि. १९ रोजी त्यांनी अट्टींगल येथील दोन आणि कोल्लम येथील एका गटास संबोधित केले. दि. २० रोजी त्यांनी पथनमतित्त आणि चेन्नगनूर जिल्ह्यांमध्ये सत्रे संचालित केली. दि. २१ रोजी कोथयम येथील के.एस.ई.बी., महात्मा गांधी विद्यापीठ आणि कुमारनेल्लुर उच्च माध्यमिक विद्यालय येथे अशी एकूण ३ सत्रे झाली आणि संध्याकाळी श्री. रामक्रिष्ण सेवाश्रम, कोची येथेही एक सत्र झाले. दि. २२ रोजी त्यांनी अलुवा आश्रम येथील अभ्यासींबरोबर संवाद साधला आणि नंतर राष्ट्रीय सेवा संघाच्या उच्च माध्यमिक विद्यालय (परक्कडवु), श्री नारायण गुरू इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि बायोटेक्नोलोजी (करमल्लुर) आणि विद्याधिराज विद्याभवन एच,एस.(अलुवा) येथेही सत्रे संचालित केली.

दि.२३ तारखेच्या सकाळी लोबेलिया उच्च माध्यमिक विद्यालय (नयनरंबलम) येथे सत्र घेण्यात आले. थिस्सुर आश्रम येथे संध्याकाळी अभ्यासींबरोबर आणि दि. २४ च्या सकाळी तेथील युवकांबरोबर त्यांनी परस्पर–संवादी सत्र संचालित केले. अंबल्लुर येथील संवादसत्रानंतर संध्याकाळी ते पलक्कड येथे खुल्या सत्रासाठी रवाना झाले. दि.२५ रोजी त्यांनी मल्लपूरम, कोझिकोडे आणि वडकारा येथे खुली सत्रे संचालित केली. शेवटचे खुले सत्र दि.२७ रोजी पय्यानूर येथे संपन्न झाले.

या सगळ्या सत्रांमध्ये बंधू दुराई यांनी गृहस्थजीवन व्यतीत करत असतानाही अध्यात्मिक साधनेची आवश्यकता, मूल्याधारीत जीवन, आधुनिक मनुष्यास स्वतःच्या संस्कारांपासून मुक्त होण्यासाठी सहजमार्गाची होणारी मदत, धर्म आणि आध्यात्मिकता यामधील फरक आणि 'परमेश्वर' ही संकल्पना या विषयांवर भाष्य केले. नवीन मूल्याधारित पिढी तयार करण्याची अध्यापकांची जबाबदारी यावर त्यांनी प्रकर्षाने जोर दिला. अभ्यासींना केंद्रातील वातावरण जाणवण्यास मदत करणारी आणि त्यांच्या शंका निरसन करणारी सत्रेही आयोजित करण्यात आली होती. दि.२८ च्या संध्याकाळी ते पय्यानूरमधून चेन्नई येथे जाण्यास निघाले.

गुजरात विभागीय बैठक (विभाग ६अ व ६ब)

दि.२४ जानेवारी रोजी बंधू सी.राजगोपालन यांचे कार्यकर्त्यांना व प्रशिक्षकांना भेटण्यासाठी अहमदाबाद येथे आगमन झाले. अहमदाबाद व गांधीनगर या केंद्रांमधील प्रशिक्षकांच्या भेटी– दरम्यान 'प्रशिक्षकांनी नियमित साधना करणे व आपापसात बंधुभाव ठेवणे गरजेचे आहे' यावर त्यांनी जोर दिला. त्यांनी प्रशिक्षकांना जवळपासच्या उपकेंद्रांना भेटी देण्यासाठी तसेच अभ्यासींना मिशनच्या कामासाठी तयार करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

दि.२५ जानेवारी रोजी बंधू सी. राजगोपालन मेहसाणा, पालनपुर, हिम्मतनगर, जामनगर, भुज व राजकोट या विभाग ६अ मधील प्रशिक्षकांना भेटले. त्यानंतर त्यांनी जवळपासच्या उपकेंद्रांतील समन्वयकांची भेट घेतली. दुसऱ्या दिवशी विभाग ६अ व ६ब मधील प्रशिक्षकांसाठी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये 'साधना आणि प्रशिक्षकांची भूमिका' यावर आधारित एका प्रश्नोत्तरांच्या सत्राचा समावेश होता.

दि.२७ जानेवारी रोजी बंधू राजगोपालन यांनी 'साधनेची मूलतत्वे' आणि 'एस आर सी एम ची तोंडओळख' यावर भाष्य केले. नवसारी, बडोदा, भरुच, अंकलेश्वर व सेलांबा येथील प्रशिक्षकांची त्यांनी भेट घेतली.

या तीनही दिवशी गुरुदेवांची उपस्थिती सर्वांनी अनुभवली. प्रत्येकाने बंधू राजगोपालन यांचे आभार मानले व मिशनच्या वृध्दीसाठी स्वत:ला वाहून घेण्याचा निश्चय केला.

सतखोल आश्रम, उत्तराखंड

दि. ३० व ३१ डिसेंबर २०१२ रोजी झालेल्या दोन दिवसीय प्रशिक्षक विकास कार्यक्रमास उत्तराखंड मधील चौवेचाळीस प्रशिक्षक उपस्थित होते. हिंदीमधील या कार्यक्रमाचे संचालन भगिनी छावी, पुनम बब्बर, विमला शेरॉन व बंधू जिग्नेश यांनी केले.

गुरुदेवांच्या उपस्थितीची अनुभूती उत्कटतेने जाणवत असणाऱ्या, भारलेल्या वातावरणात सर्वांची हृदये खुली झाली, बंधुभाव निर्माण झाला आणि सर्वजण व्यासंगपूर्ण अभ्यासी बनण्याकरीता व उत्तम काम करून 'त्यां'च्या प्रशंसेला पात्र ठरण्यासाठी वचनबद्ध झाले. प्राविण्य मिळवण्यासाठी लागणारे कौशल्य शिकण्यासाठी प्रत्येक सत्रानंतर थोडा अभ्यास, काही प्रात्यक्षिके करण्यात आली आणि मौनात गुंग होण्यासाठी, सखोल चिंतनासाठी, त्यांच्या अर्थाच्या खोल गाभ्यामध्ये बुडी मारून, ताजेतवाने, टवटवीत तसेच अधिक ध्येयाभिमुख होऊन, प्रशिक्षकाच्या कामाच्या उद्देशाच्या गांभीर्याची पक्की जाणीव होऊन बाहेर येण्यासाठी, व्हिस्पर्स मधील बाबूजी महाराजांचे अनेक संदेश व गुरुदेवांची भाषणे सादर करण्यात आली.

प्रशिक्षक चर्चासत्र, त्रिची

त्रिची आश्रमात दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान बंधू संतोष श्रीनिवासन द्वारा संचालित एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या निवासी चर्चासत्रासाठी भारतातील त्रेसष्ठ प्रशिक्षक तसेच विदेशातील काही प्रशिक्षकसुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रत्येक पैलूत गुरुदेवांचा समावेश होता. प्रशिक्षकाचा अत्यावश्यक दृष्टीकोण, स्वत:साठी व त्यांच्यावर सोपवलेल्या अभ्यासींसाठी मजबूत पाया तयार करण्यातील प्रशिक्षकाची भूमिका खास नमूद करून सांगणे, प्रशिक्षकाला आवश्यक असणारा दृष्टीकोन व अभ्यासींची साधना हा या चर्चासत्राचा प्रमुख केंद्रबिंदू होता.

दि.२२ जानेवारी रोजी गुरुदेवांचे आगमन झाले आणि हे चर्चासत्र भाषणे, आत्मपरीक्षण, गट चर्चा, भूमिका साकारणे व असेच चैतन्यपूर्ण उपक्रम तसेच आत्मनिरीक्षणासाठी वेळ, साधना, सत्संग अशा ठरलेल्या वेळाप्रत्रकाप्रमाणे पार पडले. दि. २३ जानेवारी रोजी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व प्रशिक्षक कसे असावेत याविषयी उपस्थितांना संबोधित केले. प्रत्येक दिवसाची सुरवात सत्संगाने होत होती व दि. २४ रोजी 'सिटींग देताना गुरुदेवांशी कसे जोडले जावे' या विषयावर भर देण्यात आला.

दि. २५ जानेवारी रोजी बंधू कमलेश पटेल यांनी सत्संगाचे संचालन केले व प्रशिक्षकाच्या कामाच्या विविध पैलूंवर भाष्य केले. त्या दिवशी संध्याकाळी बंधू कृष्णा यांनी 'एखाद्याला सहज मार्गाचे आकलन किती योग्य प्रकारे झाले आहे' यावर उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर एक प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. दि. २६ रोजी गुरुदेवांच्या सत्संगाने व भाषणाने चर्चासत्राची सांगता झाली. प्रत्येक संध्याकाळ सहभागींनी गुरुदेवांसोबत व्यतीत केली व रात्रीचे भोजन जानकी फार्म येथे घेतले. या चर्चासत्राने प्रत्येकाच्या अनुभवांमध्ये सखोलता निर्माण झाली व ते सर्वजण हाती घेतलेले काम दाखविलेल्या दिशेने, अग्रक्रमाने करण्यासाठी नवा जोम घेऊन परतले.

युवकांचे उपक्रम

नचिपलायम आश्रम, कोईंबतूर

दि. २९ व ३० डिसेंबर रोजी कोईंबतूर येथील नचिपलयम आश्रमात आयोजित केलेल्या या कार्यक्रमात कोईंबतूर, पोल्लाची, व पलानी येथील तीस युवक सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरवात सत्संगाने झाली, त्यानंतर सहभागींना संकोच सोडून एकमेकांना जाणून घेण्याची संधी देणारे एक सत्र झाले. ध्येय, जगाचे यथार्थ दर्शन, साधना, एकता व बंधुत्वाबाबतचा दृष्टीकोन यावरील सत्रे तसेच परस्पर संवादी गट चर्चाही अंतर्मुख करणाऱ्या होत्या. संघबांधणी करणारे खेळ व गाण्यांमुळे सहभागी एका कौटुंबिक बंधात बांधले गेले व त्यांच्यातील बंधुत्वाची भावना वाढण्यास मदत झाली.

'सेवा – आध्यात्मिक प्रगतीची गुरुकिल्ली' हे सत्र विभाग प्रमुख बंधू विश्वनाथ राव यांनी संचालित केले. 'क्रेस्ट' या विषयावरील सत्राने युवकांना तेथे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रेरीत केले. दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम व्हिस्पर्स मधील बाबूजी महाराजांचे संदेश, गुरुदेवांची भाषणे व युवकांसाठी प्रेरणादायी अशा चित्रफीती यांवर आधारीत होता.

युवक चर्चासत्र, पनवेल आश्रम, मुंबई

दि.२६–२७ जानेवारी रोजी महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजरात येथील शंभराहून अधिक सहभागी युवक पनवेल आश्रम, मुंबई येथे जमले होते. 'गुरुदेवांच्या स्वप्नासाठी एकत्र काम' ही संकल्पना होती आणि गुरुदेवांच्या 'द्रष्टा बना' या भाषणाने प्रेरित झालेल्या युवकांना एकत्र येऊन एकोप्याने काम करण्याची आवश्यकता लक्षात आली.

'नासा सर्व्हाव्हल गेम' या सारख्या खेळामुळे एकत्रपणे काम करताना आवश्यक असणारे गुण अधोरेखीत झाले. क्रेस्टच्या कार्यक्रमास हजर असलेल्या व रिट्रीट सेंटर मधे गेलेल्या युवकांनी त्यांचे अनुभव सांगितले त्यामुळे अशा कार्यक्रमांना उपस्थित रहाण्याची प्रेरणा इतरांना मिळाली.

बेंगलोर

दि.१८ ते २० जानेवारी दरम्यान क्रेस्ट बेंगलोरने ब्याऐंशी युवक सहभागींचे यजमानपद भूषवले. अनेक सहभागी युवक हे क्रेस्टला प्रथमच भेट देत होते. क्रेस्टच्या वेळापत्रकाने सहभागींना सकाळी ४:१५ ते रात्री १०:०० पर्यंत व्यस्त ठेवले होते.

'स्वत:मध्ये बदल घडवण्यासाठी स्वत:च्या माध्यमामधून स्वत:वर काम' (बंधू गोपालन), 'अमर्याद सामर्थ्याची बीजे' (बंधू भद्रेश) व '५०० मेंढ्यांपेक्षा एक सिंह अधिक चांगला' (बंधू डॉ कृष्णमूर्ती) या व्याख्यात्यांनी सहभागींना प्रेरित केले व विचारांसाठी पुरेसे खाद्य पुरवले.

मातीच्या प्रतिकृती व छायाचित्रण अशा उपक्रमांमुळे त्यांना त्यांचे विचार सर्जनशीलपणे व्यक्त करता आले व त्यांच्या सभोवतालच्या परिसराकडे एका नव्या दृष्टीकोनातून पाहता आले. त्यांचे सुसंघटीत काम व सर्जनशीलता ही दृष्ट लागण्यासारखी होती.

वाचनालयाच्या वेळी विविध प्रसंगी गुरुदेवांनी सुचवलेल्या पुस्तकांपैकी एक पुस्तक प्रत्येक गटास देण्यात आले. गटाने ते वाचून, चर्चा करून पुढील दुपारी त्याविषयीचे सादरीकरण करावयाचे होते.

सर्व दहा गटांनी त्यांच्या पुस्तकाचे सार निरनिराळ्या पध्दतीने सादर केले. त्यांचा उत्साह व गटातील सर्वांनी मिळून केलेले काम पाहण्यासारखे होते. सहभागी युवक त्यांना दिलेल्या संधीबाबत आभारी होते व तिचा पुरेपूर उपयोग करण्याची आकांक्षा मनात बाळगून होते.

अडालज योगाश्रम, अहमदाबाद

दि. ६ जानेवारी २०१३ रोजी विविध संस्थांमधील ४० वर्षांखालील युवकांसाठी 'ध्यानाद्वारे जीवनाचे संतुलीत अस्तित्व' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

बंधु जिग्नेश शेलाट यांनी संचालित केलेल्या या दोन तासाच्या

कार्यक्रमात गटचर्चा व सहजमार्ग प्रणालीची ओळख यांचा समावेश होता. याचा प्रभाव लक्षणीय होता व त्यामुळे आयोजकांना अशाच प्रकारचे खुले सत्र दर तीन महिन्यांनी आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

युवा कार्यक्रम, अहमदनगर

दि. ३० डिसेंबर २०१२ रोजी अहमदनगर केंद्रात 'सतत स्मरण' या संकल्पनेवर कार्यक्रम आयोजित केला होता. भजन व कवितेद्वारे गुरूदेवांवरील प्रेम व्यक्त करण्यात आले. बंधू तपस कुलकर्णी यांनी

केंद्राच्या २०१२ मधील कार्यक्रमांची माहिती दिली. त्यानंतर अभ्यासींनी मिशनचे साहित्य वाचावे व बाबूजी महाराजांची शिकवण समजून घ्यावी यासाठी 'ऋतुवाणी' या पुस्तकावर आधारीत प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम झाला. परस्परांची ओळख होण्यास मदत व्हावी व बंधुत्व निर्माण व्हावे यासाठी बंधु, भगिनी व मुले अशा तीन गटांमधे परस्पर संवाद साधण्याचे सत्र संचालित केले गेले. 'सतत स्मरण' या विषयावरील नाटकाने व नविन वर्षाच्या स्वागतासाठी केक कापून कार्यक्रमाची सांगता झाली.

वडोदरा

वडोदरा केंद्रातील युवकांनी आश्रम परिसरात विविध रोपांची लागवड करून प्रजासत्ताक दिन साजरा केला. जर आपण निसर्गाची कदर केली व प्रेमपूर्वक निगा राखली तर निसर्ग हा खरोखरीच सर्वोत्तम असा मित्र आहे.

प्रशिक्षक मेळावा–शहाजहानपूर

डिसेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात अडतीस प्रशिक्षक शहाजहानपूर आश्रमात आयोजित केलेल्या चर्चासत्रात सहभागी झाले होते. 'साधनेच्या मुलभूत बाबींचे परिपूर्ण अध्यापन/ साधनेचा पक्का पाया' या कार्यक्रमाने याची सरुवात झाली. पुढील दिवशी सहभागींना पाच गटांमध्ये विभागण्यात आले व त्यांना चर्चेसाठी विविध विषय देण्यात आले.

- कित्ता गिरवण्यासारखी / आदर्श बनण्यासारखी सेवा कशी करावी.
- केंद्राच्या विविध विभागांची सखोल वैयक्तिक गुणग्राहकता कशी विकसीत करावी.
- गुरुदेवांसोबतचे बंध अधिकाधिक दृढ करण्यासाठी अभ्यासींना प्रेरित व प्रवृत्त कसे करावे.
- ध्येयाने प्रेरित झालेला, क्रियाशील व पुरेसा असा स्वयंसेवकांचा समूह एकत्र आणून त्यांच्यामधे सुसंवाद व बंधुत्व कसे वाढवावे.
- केंद्राच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी यथार्थ आराखड्याचा विकास कसा करावा.

चर्चेनंतर आणि एकमेकांचे अनुभव व कल्पना याची देवाणघेवाण झाल्यानंतर सर्व सहभागींनी आपापल्या केंद्रातील त्रुटी स्वीकारल्या व सुधारणा करण्यासाठी बदल घडवायचे ठरवले. आंतरिक आनंद प्रज्वलित झाल्याने चमकणारे सहभागींचे चेहरे, हे संपूर्ण सत्र वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे, अतिशय उत्तम प्रकारे आयोजित केलेले व योग्य प्रकारे स्वीकारले गेलेले होते याचा पुरेसा पुरावा देत होते.

नव्या नेमणुका

केंद्रप्रमुख

पतियाला, पंजाब –बंधू अनिल वशिष्ठ
नवसारी, गुजरात– बंधू नितीन नारनदास हरियाणी
राजकोट, गुजरात– बंधू सतिश बलवंतराय मेहता
वापी, गुजरात– बंधू प्रकाश दयाराम पटेल
त्रिप्रायार, केरळ –बंधू एस जयकुमार
वाराणसी, उ.प्र. –भगिनी माया सिंग
विशाखापट्टणम, आ. प्र.– बंधू कोलाचिना सप्तमुखुलु
लखनौ, उ.प्र. –भगिनी प्रियदर्शिनी सक्सेना

विभागप्रमुख

ओडिशा – बंधू गंदर्भ बेहेरा
महाराष्ट्र (पश्चिम व गोवा)– डॉ. सुभाष वैद्य
महाराष्ट्र (मध्य)– बंधू अरुण कुमार चौहान
महाराष्ट्र (विदर्भ)– बंधू राजेंद्रन रेथीनाम
मध्यप्रदेश (पश्चिम)–बंधू प्रभाकर दास
मध्यप्रदेश (पूर्व) – मेज. जन. ए. एन. मुद्रे

लखनौ, आश्रम व्यवस्थापक–बंधू ओम प्रकाश गुलिया
व्यवस्थापक, मलमपुझ्झा रिट्रीट सेंटर– बंधू के. चन्द्रशेखरन नायर

प्रकाशाचे केंद्र

अल्वर आश्रम, राजस्थान

"आपली वागणूक गुरुदेवांप्रमाणे ठेवण्याचा आपण प्रयत्न करावा. जर ते विनम्र असतील तर आपणही विनयशील बनण्याचा प्रयास करावा. सवयीने नम्रता अंगी बाणते. ज्या व्यक्तीवर आपले निरतिशय प्रेम आहे व ज्यांचा आपण आदरपूर्वक स्वीकार केला आहे अशा व्यक्तीच्या केवळ अनुकरणाने आपण आपल्या चारित्र्यात बदल घडवून आणू शकतो."

पी. राजगोपालाचारी, ४ मे १९९०, प्रशिक्षक चर्चासत्र, सारिस्का.

नयनरम्य अशा अरवली पर्वतराजींमध्ये वसलेले अल्वर हे राजस्थानाचे 'सिंहद्वार' म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण दिल्लीच्या दक्षिणेला १६० कि.मी. अंतरावर असून जयपूरच्या उत्तरेला १५० कि.मी.वर आहे. १९८९ मध्ये जेव्हा बंधू गोकुळ गोस्वामी यांची येथे बदली झाली तेव्हा हे केंद्र अस्तित्वात आले. यानंतर बंधू जे.पी. दुबे व त्यांच्या पत्नी हे अभ्यासी बनले. पुढील काही वर्षे बंधू दुबे यांच्या घरी सत्संगांचे संचालन होत असे. ऑक्टोबर १९९६ मध्ये बंधू दुबे यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ति झाली. अभ्यासींची संख्या वाढल्याने सत्संगाचे संचालन एका शाळेत होऊ लागले.

संपूर्णत: विकसित अशा आंबेडकर नगर या निवासी वसाहतीमध्ये आश्रम स्थित आहे. आश्रम रेल्वे स्थानकापासून केवळ ०.४ कि.मी. तसेच बस स्थानकापासून ०.६ कि.मी. अंतरावर आहे.

दि.३ ते ५ मे १९९० दरम्यान सारिस्का पॅलेस हॉटेल येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक कार्यक्रमाच्या वेळी गुरुदेवांनी अल्वरला पहिल्यांदा भेट दिली. दि. १९ व २० ऑक्टोबर १९९९ रोजी झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या वेळी गुरुदेव दुसऱ्या वेळी अल्वर येथे आले. गुरुदेवांच्या भेटींमुळे या केंद्राची प्रगती झाली. सध्या तेथे सुमारे ३०० नियमित अभ्यासी आहेत.

२०५१ चौ. मीटर क्षेत्रफळ असणारी जमीन राजस्थान सरकारने यु. आय. टी., (अल्वर) द्वारा ९९ वर्षांच्या भाडेतत्त्वावर मिशनला दिली. या भाडे कराराचे नोंदणीकरण एस. आर. सी. एम. चे सचिव बंधू उमा शंकर वाजपेयी यांनी १ नोव्हेंबर २००७ रोजी केले.

दि. २८ जानेवारी २०१० रोजी गुरुदेवांनी आश्रमाच्या कोनशीलेचे अनावरण केले व या समारंभासाठी जमलेल्या सुमारे ५०० अभ्यासींकरीता सत्संगाचे संचालन केले. तेव्हापासून या ठिकाणी प्रेमाने व भक्तीपूर्वक अनेक समारंभ संपन्न झाले. केवळ अल्वरच्याच नव्हे तर राजगढ, खैरताल, कोटपुतळी, बांदिकुई, महावा व पिलवा या केंद्रांच्या अभ्यासींचा यांमध्ये सहभाग होता.

आत्तापर्यंत आश्रमाभोवती भिंतीचे बांधकाम पूर्ण झाले असून २६ फूट गुणीले ७६ फूट क्षेत्रफळाचा ध्यान–गृह म्हणून वापरला जाणारा कक्ष, त्याच्या शेजारी गुरुदेवांचे कार्यालय, स्वयंपाक गृह, आश्रमाची देखरेख करणाऱ्याचे वसति–स्थान, स्नान–गृह, प्रसाधन कक्ष, बोर–वेल व त्याकरीता २ हॉर्सपॉवरचा पाण्याखालचा पंप हे सर्व तयार झालेले आहे. फुलझाडे व वृक्षांनी आच्छादित अशी हिरवळ आश्रमाच्या आत तसेच बाहेर असल्यामुळे तो देखावा नयनरम्य दिसतो. भविष्यामध्ये ५० फूट गुणीले ७० फूट क्षेत्रफळाचे ध्यान–गृह बांधण्याचा प्रस्ताव आहे.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.